**महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, २०१० अंतर्गत राज्यातील जिल्हयाच्या ठिकाणी ग्रंथोत्सवाचे आयोजन करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक-रासांधो-१०१२/प्र.क्र.९०/२०१२/भाषा-३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक :- २६ नोव्हेंबर, २०१२.**

वाचा :- **१) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.योजना-१०११/प्र.क्र.७६/२०११/भाषा-३, दिनांक २० डिसेंबर, २०११,**
**२) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.पूरक १०११/प्र.क्र.६६/२०११/भाषा-३, दिनांक २३ डिसेंबर, २०११,**
**३) नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२००९/अनौसं-४८/प्र.क्र.१५४/नवि-२०, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१२.**

**<u>प्रस्तावना</u>** :-

ग्रामीण व शहरी भागातील लोकांमधील, वाचन संस्कृतीमध्ये वाढ व्हावी या हेतुने राज्य शासनातर्फे ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ग्रंथप्रेमींना एकाच ठिकाणी विविध ग्रंथ / साहित्य व वाड्.मय विषयक पुस्तके उपलब्ध व्हावी, तसेच प्रकाशक आणि ग्रंथ विक्रेता यांना ग्रंथ विक्रीसाठी एकाच ठिकाणी आवश्यक ती सुविधा उपलब्ध व्हावी, हा ग्रंथमहोत्सव आयोजनामागील उद्देश आहे. याकरीता शासन पातळीवरील प्रयत्नांचा भाग म्हणून प्रतिवर्षी ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येते. त्यासाठी राज्य शासनाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने ग्रंथोत्सव जोपासना अभियान अंतर्गत **"ग्रंथोत्सव-२०१२"** हा उपक्रम राज्यातील जिल्हयांच्या ठिकाणी राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :-

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण-२०१० अंतर्गत **"ग्रंथोत्सव-२०१२"** हा उपक्रम राज्यातील जिल्हयांच्या ठिकाणी महाराष्ट्र शासनाच्या, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या ३३ जिल्हा माहिती अधिकारी (मुंबई व बृहन्मुंबई वगळून) तसेच उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली व पणजी (गोवा) यांच्यामार्फत माहे-डिसेंबर, २०१२ ते फेब्रुवारी, २०१३ या कालावधीत राबविण्यात येईल. सदर उपक्रम राबविण्यासाठी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात शासनाने रुपये ३५.०० लक्ष एवढी तरतूद केलेली आहे. सदर निधी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरित व वितरित करण्यास या शासन निर्णयाव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

**कृ.मा.प.**

२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी सदर निधी संबंधीत जिल्हयाचे जिल्हा माहिती अधिकारी यांना व उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली आणि उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी, गोवा यांना प्रत्येकी रुपये १.०० लक्ष (रुपये एक लक्ष मात्र) याप्रमाणे वितरित करावा.

३. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या त्यांच्या अधिपत्याखालील दुय्यम अधिकाऱ्यास यासंबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास या आदेशाव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. **"ग्रंथोत्सव-२०१२"** च्या आयोजनाच्या खर्चाचा सर्व तपशील संबंधीत जिल्हयाच्या जिल्हा माहिती अधिकाऱ्यांकडून सदरहू ग्रंथोत्सव झाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी प्राप्त करुन घ्यावा व सदर तपशील शासनास सादर करावा.

५. या प्रित्यर्थ होणारा खर्च सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात, मागणी क्रमांक झेडएफ ०२ - २२०५ - कला व संस्कृती (०२) (०२) - राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (२२०५ ३२१४) - ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (योजनांतर्गत) या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भगविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र.२०१२११२७१२००१०७४३३ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( ललिता शि. देठे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सचिव, मराठी भाषा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
३. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
४. संचालक / उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (१०प्रती),
५. सर्व जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
६. उप संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली,
७. उप संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी, गोवा,
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
९. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१२. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई,
१३. वित्त विभाग / व्यय-४, मंत्रालय, मुंबई,
१४. अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. संचालक, भाषा संचालनालय, बांद्रा, मुंबई,
१६. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
१७. संचालक राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
१८. सर्व कार्यासने, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
**१९. भाषा-३ (निवडनस्ती).**